☎ : 02385 (Offi.) 259825 (Fax) 259825

Balbhagwan Shikshan Prasarak Mandal, Ahmedpur

**DHANWANTARI AYURVED MEDICAL COLLEGE & HOSPITAL,**

**Degloor Road, UDGIR-413517 Dist. Latur (Maharashtra)**

e-mail : damr_udg@rediffmail.com

Permitted by CCIM & Dept. of AYUSH, Ministry of Health & Family Welfare, New Delhi,
Recognised by Govt. of Maharashtra, and Affiliated to MUHS, Nashik.

Q.No. DAMRU/ 648/2019 Date : 22/ 06 /2019

## पाचव्या आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त आयोजित योग सप्ताहाचा अहवाल

पाचव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विविध योग विषयक कार्यक्रमांचे आयोजन धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, उदगीर द्वारे करण्यात आले होते. १४ जून २०१९ ते २१ जून २०१९ ह्या कालावधीत योग सप्ताह साजरा करण्यात आला. रुग्णालयातील आंतर रुग्ण विभाग व बाह्य रुग्ण विभागातील रुग्णांना त्यांच्या व्याधीनुसार विविध हितकारी आसन व प्राणायाम ह्यांचा प्रात्यक्षिक अभ्यास रोज सकाळी ६.३० ते ८.३० ह्या वेळेत करण्यात आला. ह्या उपक्रमाचा आंतर रुग्ण विभागातील ३७ रुग्णांनी व बाह्य रुग्ण विभागातील ६८ रुग्णांनी लाभ घेतला. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी देखील योग सप्ताह अंतर्गत योग प्रात्यक्षिक अभ्यासाचे आयोजन करण्यात आले होते.

२० जून २०१९ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. निबंध स्पर्धेत योग व स्त्रियांचे आरोग्य (Yoga and Women's Health), विद्यार्थ्यांसाठी योग (Yoga for Students ) व प्रमेह आणि योग (Yoga for diabetes) ह्या विषयांवर निबंध लिहून 44 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यातून कु.खोपे संघमित्रा (तृतीय वर्ष बी.ए.एम.एस.) व कु. मालुंजेकर श्रुती (तृतीय वर्ष बी.ए.एम.एस.) ह्यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल गौरविण्यात आले. हृदयविकार आणि योग (Yoga for Heart) ह्या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेत 11 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व त्यातून कु. साबू कांचन (तृतीय वर्ष बी.ए.एम.एस.) ह्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल गौरविण्यात आले.

योग अभ्यासातील एक प्रमुख अंग असणाऱ्या शुद्धीक्रीयांचे प्रात्यक्षिक सादरीकरण दि. १६ जून २०१९ रोजी सकाळी ७.०० ते ९.०० दरम्यान योग सभागृहात करण्यात आले. यामध्ये वमन धौती, कपालभाती, त्राटक, नौली क्रिया, जल नेति, सूत्र नेति ह्या क्रियांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. ह्या सर्व शुद्धीक्रीयांचे लाभ व ह्या क्रिया करताना कुठल्या प्रकारची काळजी घेणे आवश्यक आहे ह्या बद्दल देखील मार्गदर्शन करण्यात आले. ह्या उपक्रमाचा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, रुग्ण व परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.

दि. २१ जून २०१९ रोजी धन्वंतरी आयुर्वेद महावियालयात सर्व विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. ह्या प्रसंगी प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील ह्यांनी ''जीवनशैलीजण्य आजार व योग' ह्या विषयावर मार्गदर्शन केले. स्वस्थवृत्त विभागातील अधिव्याख्याता डॉ. अविनाश जाधव ह्यांनी 'हृदयविकार व योग' ह्यावर मार्गदर्शन केले.डॉ.बी.डी.कट्टेवार, डॉ.एस.आर. श्रीगिरे व डॉ.पुष्पा गवळे ह्यांची प्रमुख उपस्थिती ह्या कार्यक्रमास लाभली व कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. सचिन टाले ह्यांनी केले.

Principal
Dhanwantari Ayurved Medical
College,UDGIR Dist.Latur-41351

☎ : 02385 (Offi.) 259825 (Fax) 259825

Balbhagwan Shikshan Prasarak Mandal, Ahmedpur

**DHANWANTARI AYURVED MEDICAL COLLEGE & HOSPITAL,**

**Degloor Road, UDGIR-413517 Dist. Latur (Maharashtra)**

e-mail : damr_udg@rediffmail.com

Permitted by CCIM & Dept. of AYUSH, Ministry of Health & Family Welfare, New Delhi,
Recognised by Govt. of Maharashtra, and Affiliated to MUHS, Nashik.


Q.No. DAMRU/648/2019 Date 22/06/2019


दि. २१ जून २०१९ रोजी सकाळी ५.३० ते ८ दरम्यान उदगीर नगर परिषद मैदानावर धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, उदगीर नगर परिषद, प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, पतंजली योग समिती, रोटरी क्लब व अन्य सेवाभावी व शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने महा योग अभ्यासाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमास अनेक मान्यवर मंडळीसह उदगीर परिसरातील सुमारे १९०० आबालवृद्ध मंडळींनी सक्रीय उपस्थिती नोंदविली. महाविद्यालयात देखील सकाळी ७ ते ८ दरम्यान योग अभ्यास करण्यात आला. यात सुमारे ५२ प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उत्साहपूर्वक सहभागी झाले. सकाळी ९ वाजता महाविद्यालयातून योग दिंडीचे प्रस्थान झाले. कृष्ण मंदिर - आप्पाराव चौक - ओम नगर - नाईक चौक - निडेबन रोड - निडेबन - रेड्डी कॉलनी ह्या मार्गाने योग दिंडीचा समारोप नाईक चौक येथे करण्यात आला. दिंडी दरम्यान योगाचे महत्त्व बिम्बविणाऱ्या घोषणा, हस्त फलक ह्यांचा वापर करण्यात आला.

आयुष मंत्रालय, नवी दिल्ली व आयुष संचालनालय,मुंबई यांच्या सूचनानुसार Yoga Locater/Tracker App वर महाविद्यालयाची नोंदणी करून योग विषयक कार्यक्रमाची माहिती अद्यावत करण्यात आली. योग सप्ताहाचे यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील स्वस्थवृत्त व योग विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. तसेच उदगीर परिसरातील नागरिक, महाराष्ट्र शासन, उदगीर नगर परिषद, प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, पतंजली योग समिती, रोटरी क्लब, उदगीर डॉक्टर्स असोसिएशन व अन्य सेवाभावी व शैक्षणिक संस्थांचे अमूल्य सहकार्य लाभले.

**Principal**
Dhanwantari Ayurved Medical
College,UDGIR Dist.Latur-41351

Screenshots of YogaLocator / YogaTracker App




Principal
Dhanwantari Ayurved Medical
College,UDGIR Dist.Latur-4135